महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712 (OFF)

E-MAIL sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in
Telegram-'SECBOARD'PUNE

महत्वाचे

क्र.पुविमं/शाखा क/आवेदन/6036
पुणे-४११००५
दिनांकः-13/11/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/विद्यालय,
जिल्हा-पुणे, अहमदनगर, सोलापूर.

विषय- माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ.10 वी) मार्च-२०२५ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या नियमित तारखांना मुदतवाढ व विलंब शुल्काच्या तारखांबाबत

संदर्भ- जा.क्र.रा.मं./परीक्षा-३/४३४६ दि.०४/११/२०२४ चे पत्र कृ.अवलोकन व्हावे.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च-२०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेस नियमित,पुनर्परिक्षार्थी,नावनोंदणी प्रमाणपत्र (**Enrollment Certificate**) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (**Private Candidate**), तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणाऱ्या, **ITI** ( औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे **Transfer of Credit** घेणारे विद्यार्थी ) चे विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाची मुदत दिनांक ०५/११/२०२४ रोजी संपली असून त्यांच्या मुदतवाढीच्या व विलंब शुल्काच्या तारखा खालील प्रमाणे आहेत.

## तक्ता अ

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SRRALDatabase'वरुन ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याच्या तारखा तसेच माध्यमिक शाळांनी पुनर्परीक्षार्थी,नाव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी(Private Candidate) ,तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, ITI (औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी ) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईन सादर करण्याच्या तारखा | माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क RTGS व्दारे भरणा करणे व RTGS/NEFT पावती चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|
| नियमित शुल्कासह | बुधवार दि.०६/११/२०२४ ते मंगळवार दि.१९/११/२०२४ | बुधवार दि.०४/१२/२०२४ |
| विलंब शुल्कासह | बुधवार दि.२०/११/२०२४ ते शनिवार दि.३०/११/२०२४ | |

A. आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांनी सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमिट केल्यानंतर त्यांना शाळा **login** मधून **pre-list** उपलब्ध करुन दिलेली असेल, माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यामार्फत आवेदनपत्रातील नमूद केलेली माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळणी करुन अचूक असल्याची खात्री करावी. सदर **pre-list** वर माहितीची खात्री केल्याबाबत संबधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केल्याबाबत मुख्याध्यापकांनी **pre-list** च्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

B. इ.१० वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाइन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी **SARAL Database** मध्ये विद्यार्थ्यांची अदययावत नोंद असणे आवश्यक आहे. सदर त्यांच्या माध्यमिक **SARAL Database** वरूनच नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

२. पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र **(Enrollment Certificate)** प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी **(Private Candidate)**, **श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, ITI (औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची माहिती SARAL Database** मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेल्या तारखांना **online** भरावयाची आहेत.

३. कौशल्य सेतु अभियानाचे **Transfer of Credit** मागणाऱ्या विद्यार्थ्यांनीदेखील **online** पध्दतीने आवेदनपत्रे भरून विषयासमोर **Transfer of Credit** ची नोंद करावी. याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांनी प्रचलित पध्दतीने आवेदनपत्रव आवश्यक कागदपत्रे यांची हार्डकॉपी(**Hard Copy**) विभागीय मंडळात जमा करावी.

४. पुणे विभागीय मंडळ कक्षेतील माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क **Website** व्दारे प्राप्त **online** चलनावर नमुद केलेल्या **ICICI** बॅंकेच्या **Virtual Account** मध्ये कोणत्याही बॅंकेमधून **RTGS/NEFT** द्वारे चलनाप्रमाणे अचुक शुल्क रक्कमेचा भरणा करण्यात यावा व चलनाची प्रत व प्रिलिस्ट **(Pri-List)** दिलेल्या विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळाकडे जमा करावी. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या **application status** मध्ये **"Draft to Send to Board"** व **Payment status** मध्ये **"Not Paid To Paid"** असा बदल आला आहे का याची खतरजमा करावी. अशा **"Send to Board"** व **"Paid status"** प्राप्त झालेली अवेदनपत्र विभागीय मंडळास प्राप्त झाले गृहीत धरून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. व उर्वरीत आवेदनपत्र **Draft Mode** मध्येच राहतील व त्याबाबत कोणतीही कार्यवाही होणार नाही.

५. यापुर्वी वापरात असणाऱ्या **BANK OF INDIA/ HDFC BANK/ AXIS BANK** च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येवु नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारण्यात येनार नाही.

६. माध्यमिक शाळांनी भरलेल्या आवेदनपत्रांमधूण निवड करून एक किंवा एकापेक्षा अधिक चलने तयार करता येतील.परंतु शुल्काचा भरणा करताना प्रत्येकी चलन स्वतंत्रपणे भरण्यात यावे. जेणेकरून त्यात समविष्ट विद्यार्थीचे **STATUS UPDATE** होईल.

७. आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क **RTGS/NEFT** द्वारेच भरण्यात यावे. सर्व माध्यमिक शाळांनी गतवर्षीप्रमाणेच परीक्षा शुल्क संगणकीय चलन **DOWNLOAD** करून चलनावरील नमुद तपशील मंडळाच्या **Virtual Account** मध्ये **NEFT /RTGS** द्वारे वर्ग करावयाचे आहे. माध्यमिक शाळांनी **NEFT /RTGS** द्वारे वर्ग केलेली रक्कम त्यांच्या बॅंक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही याची खात्री करावी. तसेच **Account Number** व **IFSC Code** चूकीचा नमुद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याचे खातरजमा करण्याची जबाबदारी संबधित मुख्याध्यापकांची राहील.

८. माध्यमिक शाळांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्राचे विहित परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत. उपरोक्तप्रमाणे परिपूर्ण व अचूक शुल्क भरल्याची

खातरजमा मुख्याध्यापकांनी करून घ्यावी. त्यानंतरच विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्यात यावीत.

९. विलंब शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखांना कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबधित मुख्याध्यापकांनी नोंद घ्यावी.

१०. आवेदनपत्रे अतिविलंब शुल्काने सादर करण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

११. विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्याचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

( औदुंबर उकिरडे )
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–४११००५

प्रत माहितीसाठी तथा कार्यवाहीस्तव

१–विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
२–शिक्षणाधिकारी, पुणे, अहमदनगर, सोलापूर
३–लेखाधिकारी पुणे विभागीय मंडळ,पुणे